**Publication:** Apla Mahanagar
**Date:** 18/11/2016
**Edition:** Pune
**Page No:** 3
**Headline:** TCS IT Wiz 2016 on Nov 22

# टीसीएस आयटी विझ स्पर्धा २२ नोव्हेंबर रोजी पुण्यात

● पुणे । प्रतिनिधी

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे येत्या २२ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा फातिमानगर चौकातील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे होणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचाही यात समावेश आहे. आठवी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेऊ शकणार आहेत.

अहमदाबाद, बंगळुरु, भुवनेश्वर, चेन्नई, कोईमतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदौर, कोची, कोलकता, लखनौ, मुंबई, नागपूर, पुणे आणि विशाखापट्टणम अशा भारतातील १५ठिकाणी टीसीएस आयटी विझ २०१६ ही स्पर्धा होत आहे. संबंधीत संस्थांकून पूर्वी सुचिता मंत्री, टीसीएस आयटी विझ संयोजक, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, ५४ बी हडपसर इंस्ट्रियल इस्टेट, हपसर, पुणे ०३ यांच्याकडे प्रवेशअर्ज पाठवायचे आहेत. अधिक माहितीसाठी ९२२८८०८३०४/८६९८८६७२९७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे किंवा http://www.tcsitwiz.com/ याठिकाणी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावर्षीच्या प्रादेशिक विजेत्यांना आयपॅड एअर मिळणार असून उपविजेत्यांना आयपॅड मिनी मिळेल. स्पर्धेविषयी-६ डिग्रीज ऑफ सेपरेशन या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेत नेटवर्किंग, तंत्रज्ञानाचे जग, लोक आणि कंपन्या यांना जोडण्यासाठी करण्याचा विचार, उपाययोजना यांवरील प्रश्नांचा समावेश असतो. स्पर्धक आपली उत्तरं फेसबुक आणि ट्विटर वर पोस्ट करु शकतील.